# जिल्हा परिषद अहमदनगर
# शिक्षण विभाग (प्राथमिक)

## योजनांची नावे

१) शालेय पोषण आहार योजना
२) सावित्रीबाई फुले दत्तक पालक योजना
३) प्राथमिक शाळांतील इयत्ता १ ली ते ४ थी तील विद्यार्थ्यांना ग्रामशिक्षण समिती मार्फत गणवेश वाटपाची योजना.
४) इयत्ता १ली ते ४थी मधील शाळेत जाणाऱ्या आदिवासी उपयोजना क्षेत्रातील तसेच आदिवासी उपयोजना क्षेत्राव्यतिरिक्त राज्यातील अन्य भागातील अनुसूचित जाती,भटक्या जाती व विमुक्त जमातीतील दारिद्रय रेषेखालील विदयार्थीनींना उपस्थितीभत्ता.
५) इयत्ता ५ वी ते ७वीच्या विदयार्थ्यांना संगणकाचे ज्ञान देण्यासाठी शाळांसाठी संगणक खरेदी / ग.शि.अ कार्यालयासाठी
६) इयत्ता ४ थीच्या विदयार्थ्यांना व शाळेस इंग्रजी विषयांची पुरक पुस्तके व इंग्रजी शब्दकोश खरेदी करणे.
७) ( जि.प. सेस ) ग्रामीण भागातील आदर्श शाळांना पुरस्कार
८) शिक्षक दिन ५ सप्टेंबर साजर करणे
९) सांस्कृतिक कार्यक्रम व विविध स्पर्धा
१०) ४ टक्के सादिल (सरंक्षण भिंत बांधकाम)
११) जि.प.सेस ( शाळा वर्ग खोल्या दुरुस्ती)
१२) ४ टक्के सादिल ( शाळा वर्ग खोल्या दुरुस्ती)

# योजनेचे नांव :- शालेय पोषण आहार योजना.

**योजनेचे स्वरुप :-** प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करण्यांच्या दृष्टीने तसेच विदयार्थ्याच्या पटनोंदणीचे उपस्थितीचे प्रमाण वाढविण्याचे दृष्टीने शालेय पोषण आहार योजना सुरु करण्यांत आली आहे.सदरची योजना सन १९९५-९६पासून सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या मार्फत ग्रामीण भागातील व शहरी भागांतील प्राथमिक शाळांतील इयत्ता पहिले ते पाच तील विदयार्थ्यांना या योजनेचा लाभ देत आहे. या योजनेखाली दररोज १०० ग्रॅम या प्रमाणे तांदुळ शिजवून दयावयाचा आहे.या योजनेअंतर्गत राज्यातील सर्व शासकीय स्थानिक संस्थातर्फे चालविलेल्या प्राथमिकशाळा व खाजगी अनुदानित प्राथमिक,माध्यमिक शाळा आश्रमशाळा,साखर शाळा , वस्तीशाळा , अपंग शाळा व महात्मा फुले हमी केंद्र या शाळांतील इयत्ता १ली ते ५ वी तील विदयार्थ्यांना लाभ देण्यांत येतो.

**लाभार्थी निवडीचे निकष :-** इयता १ ली ते ५ वी तील उपस्थित सर्व विद्यार्थी

TOP

# योजनेचे नांव :- सावित्रीबाई फुले दत्तक पालक योजना

**अनुदानाची रक्कम** :- ही योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी शिक्षण विभागाने जिल्हयासाठी २ कोटी रुपये देणगी रुपाने जमा करुन सदरचा निधी कायम ठेव म्हणून बॅन्केमध्ये फिक्स डिपॉझिटमध्ये ठेवून येणाऱ्या व्याजामधून ही योजना राबविली जाते.

**योजनेचे स्वरुप** :- जे पालक प्रत्यक्षात गरजू मुलींशी संपर्क साधू शकत नाही परंत ज्यांना या कामासाठी अर्थसहाय्य करण्याची इच्छा आहे अशा सामाजिक बांधीलकी असणाऱ्या व दानशूर व्यक्तींच्या मदतीने प्रत्येक जिल्हा स्तरावर सावित्रीबाई फुले दत्तक पालक योजना निधी जमा करण्यांत आला आहे

**लाभार्थी निवडीचे निकषः-**

१) ग्रामीण भागांत आर्थीक दृष्टया मागासलेल्या मुलींना आणि शहर उपनगरातील झोपडपट्टयातील गरजू मुलींना या योजनेचा लाभ देण्यांत येतो.

२) अनुसूचित जाती/जमाती ,भटक्या आणि विमुक्त जातीतील मुलींना प्राधान्य देण्यांत येते.

३) इयत्ता १ ली ते ८ वी मध्ये शिकणाऱ्या मुलींना या योजनेचा लाभ देण्यांत येतो.

४) पात्र विदयार्थींनींना दरमहा रुपये ३०/-देण्यांत येतात.

TOP

**योजनेचे नांव :- प्राथमिक शाळांतील इयत्ता १ ली ते ४ थी तील विद्यार्थ्यांना ग्रामशिक्षण समिती मार्फत गणवेश वाटपाची योजना.**

**योजनेचे स्वरुप :-** प्राथमिक शाळातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना विशेष सुविधा अंतर्गत गणवेश व लेखन साहित्य पुरवठा करणे ही योजना सन १९७९ पासुन सुरु करण्यांत आली आहे.

प्राथमिक शाळांतील इयत्ता १ ली ते इयत्ता ४ थी मध्ये शिक्षण घेत असलेल्या अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती,भटक्या जमाती व विमुक्त जमातीच्या दारिद्रय रेषेखालील मुलांना गणवेशाचे संच आणि लेखन साहित्य मोफत पुरविण्यांत येतात. प्रत्येक विद्यार्थ्यास गणवेशाचे एक संच व लेखन साहित्य पुरविण्यांत येते. लेखन साहित्यात पाटया, पेन्सिल इत्यादी साहित्य पुरविण्यांत येते.

**लाभार्थी निवडीचे निकष :-** १) वस्तीशाळेमध्ये शिकणारे सर्व विद्यार्थी यांना प्रथम प्राधान्याने गणवेश व लेखन साहित्य पुरवठा योजनेचे लाभ देण्यांत यावा.

२) इयत्ता १ ली ते ४ थी मधिल दारिद्रय रेषेखालील अनुसूचित जाती, जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती संवर्गातील सर्व विद्यर्थी.

३) उपरोक्त (१) व (२) गटातील विद्यार्थ्यांना गणवेश पुरवठा करुन निधी शिल्लक राहिल्यांस १०३ विकास गटातील सर्वसाधारण संवर्गातील दारिद्रय रेषेखालील इयत्ता १ ली ते ४ थी मधील मुलींना याचा लाभ देण्यांत यावा. हालाभ देताना इयत्ता १, २री, ३ री व ४ थी या क्रमाने प्राथम्य ठरविण्यांत यावे.

४) उपरोक्त तिन्ही गटातील विद्यार्थ्यांना गणवेश वाटप करुनही निधी शिल्लक राहिल्यांस १०३ विकास गटातील सर्वसाधारण संवर्गातील दारिद्रय रेषेखालील इयत्ता १ ली ते ४ थी मधील मुलांना याचा लाभ द्यावा.

TOP

| | |
|---|---|
| **योजनेचे नांव :-** | **इयत्ता १ली ते ४थी मधील शाळेत जाणाऱ्या आदिवासी उपयोजना क्षेत्रातील तसेच आदिवासी उपयोजना क्षेत्राव्यतिरिक्त राज्यातील अन्य भागातील अनुसूचित जाती,भटक्या जाती व विमुक्त जमातीतील दारिद्रय रेषेखालील विदयार्थीनींना उपस्थितीभत्ता.** |

**योजनेचे स्वरुप :-** इयत्ता १ ली ते ४ मध्ये शाळेत जाणाऱ्या अनुसूचित जमातीमधील मुलींना व अनुसूचित जाती,भटक्या व विमुक्त जमातीलतील दारिद्रय रेषेखालील मुलींना व आश्रम शाळेत डेस्कॉलर मुलींना प्रतिदिनी रुपये-१/- प्रमाणे उपस्थिती भत्ता देण्यांत येतो.दारिद्रय रेषेखालील मुलींचे प्राथमिक स्तरावर शाळेत देनंदिन उपस्थितीचे प्रमाण कमी असल्यामुळे त्या मुलींना प्रोत्साहन म्हणून उपस्थ्तिी भ्ंत्ता देण्याचे या योजनेत प्रस्तावित करण्यांत आले आहे.शैक्षणिक वर्षातील एकूण कामकाजाचा विचार करुन सर्वसाधारण दर दिवसांस १ रुपया याप्रमाणे वर्षाचा एकूण २२० रुपये भत्ता अनुज्ञेय राहील हा उपस्थिती भत्ता मुलींच्या पालकांना मिळणार असल्यामुळे पालक हे मुलींना शैक्षणिक वर्षात जास्तीत जास्त दिवस उपस्थित राहण्याबद्दल दक्षता घेतील व त्याचा परिणाम मुलींची गळती व नापासी कमी होईल.

**लाभार्थी निवडीचे निकषः-**

१) इयत्ता १ ली ते ४ मध्ये शाळेत जाणाऱ्या अनुसूचित जमाती मधील मुलीं व अनुसूचित जाती,भटक्या व विमुक्त जमातीलतील दारिद्रय रेषेखालील मुलीं.

२)मुलींची उपस्थिती शालेय दिवसाच्या संख्येच्या ७५ टक्के असणे अनिवार्य राहील.

३) उपस्थिती भत्त्यासाठी ग्रामिण विभागासाठी रुपये-११,०००/- व शहरी विभागासाठी रुपये -११,८५०/-ही रक्कम दारिद्रय रेषेसाठी वार्षिक उत्पन्नाची मर्यादा राहील.

TOP

| | |
|---|---|
| **योजनेचे नांव :-** | **इयत्ता ५ वी ते ७वीच्या विदयार्थ्यांना संगणकाचे ज्ञान देण्यासाठी शाळांसाठी संगणक खरेदी / ग.शि.अ कार्यालयासाठी** |

**योजनेचे स्वरुप :-** जिल्हा परिषदेच्या अधिनिस्त असणाऱ्या प्राथमिक शाळा,ग्रामीण डोंगराळ अति दुर्गम भागात आहेत.प्राथमिक शाळेतील विदयार्थ्यांना नवीन विज्ञानाची माहिती होण्यासाठी इयत्ता ५ वी ते ७ वी वर्ग असणाऱ्या प्रत्येक शाळेस संगणक पुरविले तर संगणकाचा निश्चितच त्यांच्या उच्च शिक्षणासाठी फायदा होईल.

**शाळानिवडीचे निकष:-**

इयत्ता ५ वी ते ७ वी च्या शाळेतील विदयार्थ्यांच्या पटानुसार क्रमाक्रमाने संगणक पुरविणे

TOP

**योजनेचे नांव :-** **इयत्ता ४ थीच्या विदयार्थ्यांना व शाळेस इंग्रजी विषयांची पुरक पुस्तके व इंग्रजी शब्दकोश खरेदी करणे .**

**योजनेचे स्वरुप :-** विज्ञान युगात इंग्रजी भाषा शिकणे काळाची गरज आहे. जिल्हा परिषद शाळामधून शिक्षक /विदयार्थ्यांना इंग्रजी विषयाचे अदयावत ज्ञान प्राप्त होण्यासाठी इंग्रजी विषयाची पुस्तके दिल्यास इंग्रजी विषयासंबंधी त्याच्या ज्ञानात निश्चितच भर पडून विदयार्थ्यांना भविष्यात त्याचा फायदा होईल.

**लाभार्थी निवडीचे निकष:-** जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील इयत्ता ४ थीचे **व इयत्ता ५ वी ते ७** वी मधील सर्व विदयार्थी

TOP

## योजनेचे नांव -: ( जि.प. सेस ) ग्रामीण भागातील आदर्श शाळांना पुरस्कार

**योजनेचा उदयेश -:** जिल्हयातील आदर्श शाळांना प्रोत्साहन देणे

**योजनेचे स्वरुप -:**

या योजनेसाठी जि.प.सेस मधून २००५-२००६ या वर्षासाठी रु.१५०००/- तरतूर करण्यात आली. प्रत्येक तालुक्याच्या गट शिक्षणाधिकारी यांचेकडून १ ली ते ४ थी पर्यंतच्या १ व इ. १ ली ते ७ वी पर्यंतच्या १ अशा दोन शाळांची नांवे मागविली जातात. त्यानंरत गट शिक्षणाधिकारी यांचे कार्यक्षेत्र बदलून त्यांना विशिष्ट प्रकारची प्रश्नावली देवून तपासणी करुन घेतली जाते. उच्चतम गुण प्राप्त होणा-या जिल्हयातील १ ते ४ च्या ४ व १ ते ७ च्या ४ अशा ८ शाळांची निवड करण्यात येते. व त्यांना कपाट, टेबल इ. असे वस्तूरुपाने बक्षीस देण्यात येते व त्या शाळांना अभिनंदनपर पत्र देण्यात येते.

**TOP**

# योजेनेचे नांव -: शिक्षक दिन ५ सप्टेंबर साजर करणे

**योजनेचा उदयेश -:** जिल्हयातील आदर्श शिक्षकांना प्रोत्साहन देणे

**योजेनेचे स्वरुप -:**

गट शिक्षणाधिकारी यांचेकडून त्यांच्या कार्यक्षत्रातील आदर्श काम करणा-या शिक्षकांची नांवे मागवून घेण्यात येते. व एक विशिष्ट प्रकारची प्रश्नावली तयार करण्यात येते. व सदरची प्रश्नावली गट शिक्षणाधिकारी यांचे कार्यक्षेत्र बदलून शिक्षकांनी केलेल्या कार्याची तपासणी करण्यात येते. व गुणनुक्रमे १४ शिक्षकांची निवड करण्यात येते. ५ सप्टेंबर रोजी शाल,श्रीफळ व स्मृती चिंन्ह देण्यात येते.

TOP

# योजनेचे नांव -: सांस्कृतिक कार्यक्रम व विविध स्पर्धा

**योजनेचा उदयेश -:** जिल्हयातील विद्यार्थ्यांची सांस्कृतिक कार्यक्रमाबाबत आवड निर्माण होणे.

**योजनेचे स्वरुप -:**

या योजने अंतर्गत तालुका स्तरावर स्पर्धा आयोजित करण्यात येतात. तालुकास्तरावर स्पर्धा झाल्यानंतर त्यामधून जिल्हा स्तरासाठी तालुक्यातील ३ विद्यार्थ्यांची निवड करण्यात येते.

जिल्हा स्तरावर स्पर्धेचे नियोजन करण्यात येऊन स्पर्धा घेण्यात येतात व त्यामधून पहिला, दुसरा,तिसरा व उत्तेजनार्थ असे ४ बक्षिस जिल्हास्तरावर देण्यात येतात. व त्या विद्यार्थ्यांना स्मृति चिंन्ह देऊन गौरविण्यात येते.

**TOP**

# योजनेचे नाव :- ४ टक्के सादिल (सरंक्षण भिंत बांधकाम)

**योजनेचे उददेश:-** १) जि.प.शाळा जागेचे अतिक्रमणा पासून संरक्षण होते,
२) संरक्षण भिंती मुळे अपघातापासून विद्यार्थ्यांचे संरक्षण होते,
३) संरक्षण भिंती मुळे बाजूच्या परिसरातील कच-यापासून विद्यार्थ्यांच्या आरोग्याचे संरक्षण होते.
४) संरक्षण भिंती मुळे शाळेचा परिसर स्वच्छ रहातो.

**योजनेचे स्वरुप :-** गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती (सर्व) यांच्या कडून ज्या शाळांना प्राधान्याने संरक्षक भिंतीची गरज आहे अश्या शाळांची यादी मागविण्यात येते.सदरच्या प्राप्त यादीनुसार कार्यकारी अभियंता जि.प.अ,नगर यांच्या कडून अंदाजपत्रके मागविण्यात येतात.अंदाजपत्रके प्राप्त झाल्यानंतर मा.मु.का.अ जि.प.अ,नगर यांच्या स्वाक्षरीने (मान्यतेने) प्रशासकीय मान्यता व अनुदान वितरण आदेश देण्यात येते.

**निवडीचे निकष :-** गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती (सर्व) यांच्या कडून ज्या शाळांना प्राधान्याने संरक्षक भिंतीची गरज आहे अश्या शाळांची यादी मागविण्यात येते.सदरच्या प्राप्त यादीनुसार कार्यकारी अभियंता जि.प.अ,नगर यांच्या कडून अंदाजपत्रके मागविण्यात येतात.अंदाजपत्रके प्राप्त झाल्यानंतर मा.मु.का.अ जि.प.अ,नगर यांच्या मान्यतेने सदर शाळेची निवड करण्यात येते.

TOP

# योजनेचे नाव :- जि.प.सेस ( शाळा वर्ग खोल्या दुरुस्ती)

**योजनेचे उददेश**:- जिल्हा परिषदेच्या ज्या प्राथमिक शाळा मोडकळीस आलेल्या आहेत व विद्यार्थ्यांना शिक्षण घेतांना खराब वर्ग खोलीत बसण्याची वेळ येऊ नये म्हणून तसेच पावसाळयात वर्ग खोलीचे छत अथवा भिंती मधून पावसाचे पाणी वर्ग खोलीत येऊ नये व विद्यार्थ्यांचे पाठयपुस्तके भिजू नयेत म्हणून शाळा खोल्या दुरुस्ती करण्याचा कार्यक्रम जि.प.सेस अंतर्गत योजना हाती घेण्यात आलेली आहे.

**योजनेचे स्वरुप** :- गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती यांच्या कडून ज्या शाळांची प्राधान्याने दुरुती करणे गरजेचे आहे आश्या शाळांची यादी मागविण्यात येते.सदरच्या प्राप्त यादीनुसार कार्यकारी अभियंता जि.प.अ,नगर यांच्या कडून अंदाजपत्रके मागविण्यात येतात.अंदाजपत्रके प्राप्त झाल्यानंतर मा.मु.का.अ जि.प.अ,नगर यांच्या स्वाक्षरीने (मान्यतेने) प्रशासकीय मान्यता व अनुदान वितरण आदेश देण्यात येते.

**निवडीचे निकष** :- गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती (सर्व) यांच्या कडून ज्या शाळांना प्राधान्याने दुरुस्ती करणे गरज आहे अश्या शाळांची यादी मागविण्यात येते.सदरच्या प्राप्त यादीनुसार कार्यकारी अभियंता जि.प.अ,नगर यांच्या कडून अंदाजपत्रके मागविण्यात येतात.अंदाजपत्रके प्राप्त झाल्यानंतर मा.उपाध्यक्ष जि.प.अ,नगर व मा.मु.का.अ जि.प.अ,नगर यांच्या मान्यतेने सदर शाळेची निवड करण्यात येते.

TOP

# योजनेचे नाव :- ४ टक्के सादिल ( शाळा वर्ग खोल्या दुरुस्ती)

**<u>योजनेचे उददेश</u>:-** जिल्हा परिषदेच्या ज्या प्राथमिक शाळा मोडकळीस आलेल्या आहेत व विद्यार्थ्यांना शिक्षण घेतांना खराब वर्ग खोलीत बसण्याची वेळ येऊ नये म्हणून तसेच पावसाळयात वर्ग खोलीचे छत अथवा भिंती मधून पावसाचे पाणी वर्ग खोलीत येऊ नये व विद्यार्थ्यांचे पाठयपुस्तके भिजू नयेत म्हणून शाळा खोल्या दुरुस्ती करण्याचा कार्यक्रम ४ टक्के सादिल अंतर्गत योजना हाती घेण्यात आलेली आहे.

**<u>योजनेचे स्वरुप</u> :-** गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती यांच्या कडून ज्या शाळांची प्राधान्याने दुरुती करणे गरजेचे आहे आश्या शाळांची यादी मागविण्यात येते.सदरच्या प्राप्त यादीनुसार कार्यकारी अभियंता जि.प.अ,नगर यांच्या कडून अंदाजपत्रके मागविण्यात येतात.अंदाजपत्रके प्राप्त झाल्यानंतर मा.मु.का.अ जि.प.अ,नगर यांच्या स्वाक्षरीने (मान्यतेने) प्रशासकीय मान्यता व अनुदान वितरण आदेश देण्यात येते.

**<u>निवडीचे निकष</u> :-** गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती (सर्व) यांच्या कडून ज्या शाळांना प्राधान्याने दुरुस्ती करणे गरज आहे अश्या शाळांची यादी मागविण्यात येते.सदरच्या प्राप्त यादीनुसार कार्यकारी अभियंता जि.प.अ,नगर यांच्या कडून अंदाजपत्रके मागविण्यात येतात.अंदाजपत्रके प्राप्त झाल्यानंतर मा.उपाध्यक्ष जि.प.अ,नगर व मा.मु.का.अ जि.प.अ,नगर यांच्या मान्यतेने सदर शाळेची निवड करण्यात येते.

**TOP**